महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/अ/किमान वेतन/२५३०८ दिनांक : १०.८.२०१६

# परिपत्रक

**विषय :** कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या विशेष भत्त्याच्या सुधारीत दराबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६, दि. ०२.०५.२०१६.
२)सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र.औसंवि/अ/किमान वेतन/४४८४, दि. ०८.०२.२०१६

........

कंत्राटीपध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनामध्ये समानता असावी व कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन तसेच इतर संविधानिक देणी मिळावी यासाठी प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३६, दि. ०२.५.२०१६ अन्वये सविस्तर सुचना / निर्देश यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. तसेच वरील संदर्भ क्र. ०२ नुसार कंत्राटी कामगारांना दि. ०१.०१.२०१६ ते दि. ३०.०६.२०१६ या कालावधीकरिता किमान वेतना सोबत द्यावयाच्या सुधारीत विशेष भत्त्याचे दर दिलेले होते.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि.) व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम -१९४८ मुंबई यांनी प्रसारीत केलेली अधिसुचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१६/कार्या १० दि. ०४.०८.२०१६ अन्वये किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगासह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना परिमंडळनिहाय **सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१.०७.२०१६ ते दि. ३१.१२.२०१६ या कालावधीकरिता खालीलप्रमाणे जाहीर केले आहेत**.

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ – १ | परिमंडळ - २ | परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | ३०५६.४० | ३०५६.४० | ३०५६.४० |

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम -१९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील रोजंदारी कामगारांकरिता जाहीर केलेले सुधारीत विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीमध्ये बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना व मृत कर्मचाऱ्यांचे अवलंबित बाह्यस्त्रोतावर काम करीत असतील तर अशा बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील. **सदर सुधारीत विशेष भत्त्याचे दर दि. ०१.०७.२०१६ ते दि. ३१.१२.२०१६ या कालावधीकरिता लागू आहेत.**

सबब, सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती केलेल्या कंत्राटी कामगारांना दि. ०१.०७.२०१६ पासून लागू केलेल्या सुधारीत विशेष भत्त्याच्या फरकाची रक्कम माहे ऑगस्ट-२०१६ च्या वेतनामध्ये ठेकेदाराकडून अदा केले जाईल यांची दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP-Circular-I.R.Dept. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(संजय ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)**

D:\archana\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc